# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** धरमपेठ झोन क्र. 2 अंतर्गत प्रभाग क्र 15 अंतर्गत विविध
**{सा.बां.वि.झोन क्र. ०२ }** ठिकाणी भिंतीचे सौंदर्यीकरण (कलाकृती रंगरंगोटी) करण्याबाबतच्या कामाची प्राकलनीय रक्कम रु. 38,67,408 /- च्या असलेल्या निविदा किंमत रु.32,22,840 /- च्या कामाकरीता प्राप्त एकुण 4 पात्र निविदा प्राप्त झाल्या असुन त्यापैकी मे. संदिप चरडे यांची निविदा किंमतीपेक्षा 11.70टक्के कमी दराची रु 28,45,768 /- तथा त्यावरील 18 टक्के जी.एस.टी. रु.5,12,238 /- अधिक रॉयल्टी इन्शुरंन्स व चाचणी शुल्क रु. 56,915 /- सह एकुण रु. 34,14,921 /- च्या कार्यराशीस व कंत्राटदार मे. संदिप चरडे यांच्या कार्यदेश निर्गमित करण्याचे मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :-

1. सदर्हु कामाला मा. अधिक्षक अभियंता यांच्याद्वारे रु 32,22,840/- च्या राशीला तांत्रिक मान्यता क्र. SE/PWD/T.S/502/21-22दिनांक 10/11/2022नुसार तांत्रिक मान्यता प्राप्त आहे.
2. सदर्हु कामास आयुक्त तथा प्रशासक, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचे आदेश क्र.प्र.मा./174/2022-23 दि. 11/11/2022 अन्वये रु. 38,67,408/- च्या प्राकलिन राशीस प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.
3. सदर्हू कामाचा खर्च पद क्र. A28901341002अंतर्गत प्रस्तावित आहे.
4. सविस्तर टिप्पणी नस्तीत उपलब्ध आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 175/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 02/12/2022**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, धरमपेठ झोन क्र. ०२ यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार धरमपेठ झोन क्र. 2 अंतर्गत प्रभाग क्र 15अंतर्गत विविध ठिकाणी भिंतीचे सौंदर्यीकरण (कलाकृती रंगरंगोटी) करण्याबाबतच्या कामाची प्राकलनीय रक्कम रु. 38,67,408 /- च्या असलेल्या निविदा किंमत रु.32,22,840 /- च्या कामाकरीता प्राप्त एकुण 4पात्र निविदा प्राप्त झाल्या असुन त्यापैकी मे. संदिप चरडे यांची निविदा किंमतीपेक्षा 11.70टक्के कमी दराची रु 28,45,768 /- तथा त्यावरील 18 टक्के जी.एस.टी. रु.5,12,238 /- अधिक रॉयल्टी इन्शुरंन्स व चाचणी शुल्क रु. 56,915 /- सह एकुण रु. 34,14,921 /- च्या कार्यराशीस व कंत्राटदार मे. संदिप चरडे यांच्या कार्यदेश निर्गमित करण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**